PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Yedyanchi Jatra
Year: 2012

Song: Uthale waadal aani haravuni
Lyricist: Guru Thakur

उठले वादळ आणि हरवूनी
गेला आज किनारा
कुणास मागू आता सावली
देईल कोण सहारा

आशेचे तारू भरकटले
आधाराचे हातही सुटले
हो आशेचे तारू भरकटले
आधाराचे हातही सुटले
पाठीवरती हात ठेवूनी
थांब म्हणाया कुणी ना उरले
थांब म्हणाया कुणी ना उरले
दिशाहीन झाल्यावरी आता
देईल कोण इशारा

कुणास मागू आता सावली
देईल कोण सहारा

हळूहळू लागे अंधारू
झुरे मनाचे खुळे पाखरू
धुक्यात हरवून गेल्या वाटा
म्हणे आता मी कुणा पुकारू
कसा चेतवू विझू लागला
आशेचा हा निखारा
कुणास मागू आता सावली
देईल कोण सहारा
देईल कोण सहारा
देईल कोण सहारा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*